नियमित दिवाणी दावा क्र. ५/२०१५
बाळू व इतर वि. शंकर व इतर
नि. क्र. १११ .

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – शेखर बसाप्पा करंबळी.

**वय** - ८४ वर्ष, **व्यवसाय** - बाँड रायटर,

**राहणार.-** गणपत गल्ली, बाजारपेठ, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**वादीतर्फे वकील श्री. एस. आर. पोवार यांच्यामार्फत.**

१. मी मागील ३५ वर्षांपासून दस्तलेखनाचे काम करीत असून माझ्याकडे त्याबाबतचा परवाना आहे. मी बाळू बाबू पारपोलकर आणि शिवराम बाबू पारपोलकर यांना ओळखत होतो. ते आता हयात नाहीत. शिवराम पारपोलकर याने बाळू पारपोलकरला त्याचा अर्धा हिस्सा खरेदीने दिला आहे. त्यांनी त्याबाबतचे माझ्याकडून दि. ३१.१२.२००१ रोजी खरेदीपत्र लिहून घेतले होते. ते लिहून झाल्यानंतर माझ्यासमोर लिहून देणार शिवराम पारपोलकरने स्वाक्षरी केली आहे.

२. आता मला ते विक्रीपत्र दाखविले, ते माझ्या हस्ताक्षरात लिहिलेले असून त्यावरती दस्तूर म्हणून माझी स्वाक्षरी आहे. त्या विक्रीपत्रावरती खरेदी देणार म्हणून शिवराम पारपोलकरची स्वाक्षरी आहे. मी त्यांच्या स्वाक्ष–या ओळखतो. त्या विक्रीपत्रास कदम व नाईक असे दोन साक्षीदार होते. सदर विक्रीपत्रातील मजकूर शिवराम पारपोलकर याच्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आलेला असून तो बरोबर आहे. त्याला **नि. क्र. ११२** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र. १–क तर्फे उलटतपास श्री. एस. एम. देशपांडे वकील यांच्या मार्फत–**

३. माझ्याकडे सन १९८८ पासून दस्त लेखनाचा परवाना आहे. मला त्याची वैधता कालावधी कधीपर्यंत आहे याबाबत सांगता येणार नाही. मी आज तो परवाना सोबत आणलेला नाही.

४. मला खरेदीदस्त करण्यापूर्वी विक्री करण्यात येत असलेल्या मिळकतीचा मूल्यांकन दाखला पहावा लागतो याची माहिती आहे. दि. ३१.१२.२००१ रोजी शिवरामने विक्री करीत

असलेल्या त्याच्या हिस्याच्या मिळकतीचे दुय्यम निबंधक कार्यालयातून मूल्यांकन करुन आणलेले होते. त्याने करुन आणलेले मूल्यांकन खरेदीपत्राला जोडलेले होते. खरेदीखतामध्ये अर्धा हिस्याची मोजमापे लिहिलेली आहेत. मला त्या दिवशी हजर असलेल्या साक्षीदारांची पुर्ण नावे सांगता येणार नाहीत.

**५**. मला बाळू व शिवराम कधी मयत झाले आहेत याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. ३१.१२.२००१ रोजी नि. क्र. ११२ प्रमाणे कोणतेही खरेदीपत्र लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला शिवरामने खरेदीपत्रा बाबत कोणतीही माहिती दिलेली नव्हती. माझ्यासमक्ष शिवराम व बाळूमध्ये आर्थिक देवाण–घेवाणीचा व्यवहार झाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी खरेदीपत्रावरती शिवराम व साक्षीदारांनी माझ्यासमक्ष सहया केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास नाही.**

**फेर तपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १२.०९.२०२४. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.